दै. लोकमत 06/06/2022

# चाकूचा धाक दाखवून लुटणारी महिलांची टोळी

## दीड लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** चाकूचा धाक दाखवून लुबाडणाऱ्या दोन महिलांना शिवाजीनगर ठाण्याच्या डीबी पथकाने पकडले आहे. १ जून रोजी लघुशंकेसाठी थांबलेल्या एका तरुणाला चाकू दाखवून त्यांनी लुबाडले होते. या महिला आरोपींकडून पोलिसांनी चोरीतील मोबाइलसह १ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दोन दिवसांत पोलिसांनी या गुन्ह्याचा छडा लावला आहे.

१ जूनच्या रात्री कंधार तालुक्यातील आलेगाव येथील माधव अप्पाराव मोरे हे अंकुर, हॉस्पिटल परिसरात रेल्वे रुळाजवळ लघुशंकेसाठी थांबले होते. यावेळी दोन महिला आणि एका पुरुषाने चाकूचा धाक दाखवून त्यांच्या खिशातील ३ हजार ४०० रुपये, मोबाइल आणि दुचाकी लंपास केली होती. मोरे यांच्या दुचाकीवर बसूनच हे दरोडेखोर पसार



झाले होते. या प्रकरणात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता. पोनि नितीन काशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाचे सपोनि रवी वाहुळे, उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे, शेख इब्राहिम, रवी बामणे, दिलीप राठोड, देवीसिंग सिंगल, शेख अजहर यांनी खबऱ्याकडून माहिती मिळविली; परंतु घटनेनंतर हे आरोपी नांदेडबाहेर पळून गेले होते. त्यानंतर पथकाने अर्धापूर येथून गंगासागर ऊर्फ माया राजू माथेकर, सीमा संतोष निळकंटे यांना ताब्यात घेतले. लुटीतील सर्व मुद्देमाल आणि चोरीतील सात मोबाइल त्यांच्याकडून जप्त करण्यात आले. या प्रकरणाचा तपास पोउपनि रोडे हे करीत आहेत.